ePaper
वक्फबाबत 'जैसे थे'ची हमी! सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाआधीच दोन तरतुदी सरकारकडून स्थगित

वर्ष - 8 । अंक - 262 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™



## आतील पानांत


- मुंबईने मिळवला सलग दुसरा विजय!
- हेनरिक क्लासेनच्या ग्लोव्हजमुळे नो बॉल
- देवही कमकुवतांच्या बाजूने नसतो!
- वक्फसाठी पंतप्रधान मोदींचे आभार


www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 18 एप्रिल 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### पहिलीपासूनच हिंदी भाषा हा सक्तीचा विषय

# हिंदी भाषेच्या सक्तीवरुन फडणवीस X राज ठाकरे!

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची राज्यामध्ये यावर्षीपासून अंमलबजावणी

। मुंबई । प्रतिनिधी । महाईन्यूज

**भारतामध्ये शैक्षणिक क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवण्याची क्षमता असलेल्या नव्या 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०' ची अंमलबजावणी आगामी शैक्षणिक वर्षापासून शालेय स्तरावर करण्यावर राज्य सरकारने मान्यता दिली आहे. या निर्णयावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते राज ठाकरे हे समोरासमोर उभे ठाकले आहेत.**



## विरोधकांचे चौफेर टीकास्त्र

### विरोधकांची आदळआपट

या नव्या शैक्षणिक धोरणावरून सर्व विरोधी पक्षांनी विशेषतः, राज ठाकरे यांनी जोरदार विरोध केला आहे. सर्व विरोधी पक्षांनी राज ठाकरेंच्या सुरात सूर मिसळला आहे.

### शिक्षण विभागाचा निर्णय

राज्य सरकारच्या शालेय शिक्षण विभागाने काढलेल्या शासन निर्णयानुसार येत्या शैक्षणिक वर्षापासून पहिलीसाठी नवा अभ्यासक्रम असेल, तसेच मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य होणार आहे. एन ए पी ची अंमलबजावणी पदवी अभ्यासक्रमासाठी २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून सुरू झाली होती. त्यानंतरचा टप्पा असलेल्या शालेय शिक्षणासाठी ही तयारी राज्य सरकारने सुरू केली होती.

### फडणवीस यांचा फुल सपोर्ट..

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिंदी भाषेच्या संदर्भात घेतल्या गेलेल्या निर्णयाला पूर्ण पाठिंबा दिला आहे. त्यांचे म्हणणे, असे आहे की देशाची संपर्क भाषा एकच असली पाहिजे आणि हिंदी ही देशातील एक संपर्क सूत्र राखणारी भाषा आहे. त्यामुळे मराठीसह देशाची संपर्क सूत्र राखणारी भाषा देखील सर्वांनी शिकलीच पाहिजे. मराठी बरोबरच हिंदी आणि इंग्लिश या भाषांवर जर मराठी मुलांनी प्रभुत्व मिळवले, तर संपूर्ण देशात आणि परदेशात मराठी मुलांचा डंका होईल अशी खात्रीही त्यांनी व्यक्त केली आहे.

### ठाकरेंसह विरोधकांचा विरोध

सरकारच्या या निर्णयावर बोलताना राज ठाकरे म्हणाले, की स्वच्छ शब्दांत सांगतो, की ही सक्ती खपवून घेणार नाही. केंद्र सरकारचे सध्या जे सर्वत्र 'हिंदीकरण' करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, ते या राज्यात आम्ही यशस्वी होऊ देणार नाही.

### महाराष्ट्रावर जबरदस्ती कशासाठी?

हिंदी ही काही राष्ट्रभाषा नाही. ती देशातील इतर भाषांसारखी एक राज्यभाषा आहे. ती महाराष्ट्रात का म्हणून पहिलीपासून शिकायची ? तुमचं त्रिभाषेचं सूत्र जे काही आहे, ते सरकारी व्यवहारांपुरतंच मर्यादित ठेवा, त्याला शिक्षणापर्यंत आणू नका. या देशात भाषावार प्रांतरचना झाली आणि ती इतकी वर्ष टिकली. पण, आत्ताच ही दुसऱ्या प्रांताची भाषा इथे महाराष्ट्रावर लादण्याचे प्रकार का सुरु झालेत? भाषावार प्रांतरचनेच्या तत्वालाच हरताळ फासला जात आहे, अशी भूमिका राज ठाकरे यांनी मांडली आहे. विरोधी पक्ष नेत्यांनी त्यात सूर मिसळला आहे.

### भाषांचा सन्मान राखला गेलाच पाहिजे

प्रत्येक भाषा ही सुंदरच असते आणि तिच्या जडण्याघडण्याच्या मागे एक दीर्घ इतिहास असतो, परंपरा असते आणि ती ज्या राज्याची भाषा असते, त्या राज्यात तिचा सन्मान राखलाच गेला पाहिजे. महाराष्ट्रात जसा मराठीचा सन्मान इतर भाषिकांकडून राखला गेला पाहिजे, तसा सन्मान इतर राज्यात त्या भाषेचा सर्व भाषिकांकडून राखला गेला पाहिजे. अगदी इतर राज्यात राहणाऱ्या मराठी जनांनी त्या राज्याची भाषा आपली मानली पाहिजे हा आमचा आग्रहच आहे. पण हे सोडून या देशाची भाषिक परंपराच खिळखिळी करणार असाल तर ते आम्हाला मान्य नाही, असे राज ठाकरे यांनी ठणकावले.

### हिंदू आहोत, पण हिंदी नाही!

आम्ही हिंदू आहोत पण हिंदी नाही आहोत! महाराष्ट्रावर हिंदीकरणाचा मुलामा द्यायचा प्रयत्न कराल तर महाराष्ट्रात संघर्ष अटळ आहे. या सगळ्याकडे पाहिले तर लक्षात येते की सरकार हा संघर्ष मुद्दाम घडवत आहे. येणाऱ्या आगामी निवडणुकांमध्ये मराठी विरुद्ध मराठीतर असा संघर्ष घडवून स्वतःचा फायदा काढून घेण्यासाठी हा सगळा अट्टाहास सुरु आहे? या राज्यातील मराठीतर भाषिकांनी पण सरकारचा हा डाव समजून घ्यावा. त्यांना तुमच्या भाषेबद्दल विशेष प्रेम आहे, असं काही नाही. त्यांना तुमची माथी भडकवून स्वतःची राजकीय पोळी भाजून घ्यायची आहे, असे राज ठाकरे म्हणाले.

### हिंदीची सक्ती महाराष्ट्रात का?

हिंदी भाषेची सक्ती महाराष्ट्रातच का ? ही अशी हिंदीची सक्ती दक्षिणेच्या राज्यात कराल का? आणि करून तर बघा, तिथली सरकारेच पेटून उठतील. येथील राज्यातील सरकार आणि त्यातील घटक पक्ष निमूटपणे हे सगळे खपवून घेतात, म्हणून इथे ही सक्ती केली जात आहे. बाकीच्यांचे आम्हाला माहीत नाही आणि आम्हाला देणे घेणे पण नाही, आम्ही हे खपवून घेणार नाही, असाच सूर सर्व विरोधी पक्षांनी आळवला आहे.

### सक्ती खपून घेणार नाही!

महाराष्ट्रात पहिलीपासून हिंदी भाषा शिकण्याची सक्ती इथे खपवून घेतली जाणार नाही. शालेय अभ्यासक्रमातील हिंदीची पुस्तकं दुकानांमध्ये विकू दिली जाणार नाहीत आणि शाळांना देखील ती पुस्तकं विद्यार्थ्यांना वाटू दिली जाणार नाहीत, याची नोंद शाळा प्रशासनाने घ्यावी.

# संमेलनाचा मान साताऱ्याला द्यावा!

## शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची साहित्य महामंडळाकडे मागणी

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'आगामी ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमंत्रकपदाचा बहुमान साताऱ्याला द्यावा,' अशी मागणी सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी गुरुवारी साहित्य महामंडळाकडे केली. 'हा निर्णय साहित्य महामंडळाची स्थळ निवड समिती घेत असते.**



९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर, उद्घाटक नरेंद्र मोदी आणि स्वागताध्यक्ष शरद पवार यांच्या भाषणावर आधारित 'मु. पो. तालकटोरा' या पुस्तकाचे प्रकाशन शिवेंद्रसिंहराजे यांच्या हस्ते करण्यात आले. साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह सुनीताराजे पवार, कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी, सरहद संस्थेचे संजय नहार, शैलेश पगारिया, श्रीराम पवार आणि शैलेश वाडेकर या वेळी उपस्थित होते. कार्यक्रमात मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळविण्यासाठी दिल्ली येथे आंदोलन करणाऱ्या भोसले यांच्यासह महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला.भोसले म्हणाले, '३२ वर्षांपूर्वी म्हणजे १९९३ मध्ये सातारा येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरविण्यात आले होते, त्या वेळी अभयसिंह महाराज यांनी स्वागताध्यक्ष म्हणून काम केले होते. आता साताऱ्याला संमेलन दिले, तर त्याच पद्धतीने आम्ही नियोजन करू. पण, संमेलनात वाद होणारच नाही, याची खात्री देऊ शकत नाही. साताऱ्याच्या वादांचा डब्बा आम्ही कायमचा बंद केला आहे. बाहेरून वाद झाले, तर ते सांगू शकत नाही.'एखाद्या मंत्र्याचा आंदोलक म्हणून स्वागत व सत्कार इतिहासात पहिल्यांदाच झाला असेल,' अशी टिप्पणी भोसले यांनी केली. दिल्ली येथील महाराष्ट्र सदनात मराठी भाषिकांना खुला प्रवेश मिळण्यासाठी, तसेच स्पर्धा परीक्षा देणाऱ्या मराठी विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाची सोय करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. जोशी म्हणाले, 'दिल्लीच्या साहित्य संमेलनात विविध विचारधारांची आणि मतांची माणसे व्यासपीठावर होती. आपल्या विचारांशी ठाम राहतानाही त्यांच्यातील सौहार्द आणि वैचारिक मोकळेपणाचे दर्शन घडले. महाराष्ट्राच्या हितासाठी पक्ष, विचारधारा आणि राजकारण दूर ठेवून महत्त्वाच्या प्रश्नांसाठी एकत्र येण्याची मानसिकता आणि राजकीय इच्छाशक्ती निर्माण झाली, तरच महाराष्ट्राचे भले होईल. देशाला विचार आणि दिशा देणारे राज्य अशी महाराष्ट्राची ओळख जपली पाहिजे.'मराठी भाषेची ओळख कधीच पुसली जाणार नाही. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देणे हा एकच ध्यास घेऊन महाराष्ट्र साहित्य परिषदेसह सर्वांनी प्रयत्न केले. दिल्लीतील आंदोलन, तसेच सतत पाठपुरावा करून या इच्छेला मूर्त स्वरूप मिळाले आहे. दिल्लीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन यशस्वी केले, याचे कौतुक आहे. महाराष्ट्र आता मागे वळून पाहणार नाही. दिल्लीच्या तख्तावर महाराष्ट्राची पकड घट्ट झालेली पाहायला मिळेल. पुणे आयोजित ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर, उद्घाटक नरेंद्र मोदी आणि स्वागताध्यक्ष शरद पवार यांच्या भाषणावर आधारित 'मु. पो. तालकटोरा' या पुस्तकाचे प्रकाशन शिवेंद्रसिंहराजे यांच्या हस्ते करण्यात आले. त्या प्रसंगी ते बोलत होते. साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह सुनीताराजे पवार, कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी, सरहद संस्थेचे संजय नहार, शैलेश पगारिया, श्रीराम पवार आणि शैलेश वाडेकर या वेळी उपस्थित होते. कार्यक्रमात मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळविण्यासाठी दिल्ली येथे आंदोलन करणाऱ्या भोसले यांच्यासह महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला.भोसले म्हणाले, '३२ वर्षांपूर्वी म्हणजे १९९३ मध्ये सातारा येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरविण्यात आले.

### वादांचा डब्बा आम्ही बंद केला

आता साताऱ्याला संमेलन दिले, तर त्याच पद्धतीने आम्ही नियोजन करू. पण, संमेलनात वाद होणारच नाही, याची खात्री देऊ शकत नाही. साताऱ्याच्या वादांचा डब्बा आम्ही कायमचा बंद केला आहे. बाहेरून वाद झाले, तर ते सांगू शकत नाही.'एखाद्या मंत्र्याचा आंदोलक म्हणून स्वागत व सत्कार इतिहासात पहिल्यांदाच झाला असेल,' अशी टिप्पणी भोसले यांनी केली.

# विद्यापीठ कायद्यात सुधारणांचा प्रस्ताव

## विभागाकडून डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उच्च शिक्षण क्षेत्रात झालेल्या बदलांच्या अनुषंगाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६मध्ये बदल करण्यात येणार आहेत. त्यासाठी माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली नऊ सदस्यांची समिती नियुक्त करण्यात आली असून, केंद्र सरकारच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०शी सुसंगत नवीन अधिनियमांची शिफारस करण्यासाठी तीन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे.**



उच्च व तंत्रशिक्षण विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. राज्यातील अकृषी विद्यापीठे, स्वायत्त महाविद्यालये, संलग्न महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०ची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. उच्च शिक्षण क्षेत्रात झालेला आमूलाग्र बदल, नवीन शैक्षणिक प्रवाहांच्या पार्श्वभूमीवर उच्च शिक्षण अधिक सुसंगत, संशोधनात्मक, रोजगारक्षम असणे, ते समाजातील सर्व घटकांना सहज उपलब्ध होणे आवश्यक आहे. विद्यापीठ अधिनियमाद्वारे उच्च शिक्षण देणाऱ्या विविध शैक्षणिक संस्था, महाविद्यालये, विद्यापीठांमध्ये निकोप, पोषक असे वातावरण निर्माण करून विद्यार्थी हाच उच्च शिक्षणाचा केंद्रबिंदू मानून त्या दृष्टीने नियोजन करणे आवश्यक आहे. त्यामुळे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने, तसेच शैक्षणिक क्षेत्रात होऊ घातलेल्या बदलांच्या अनुरूप महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मध्ये आवश्यकतेनुसार सुधारणा करण्यासाठी उच्चस्तरीय समिती नियुक्तत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ला सुसंगत असणे, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अवलंबल्या जात असलेल्या उपाययोजना, अधिनियमांचा विचार करून नवीन अधिनियमातील कलमे स्वयंस्पष्ट आणि सुटसुटीत असणे, समितीने व्यवहार्य, वस्तुनिष्ठ, अंमलबजावणी करण्यायोग्य शिफारशी करणे अशी समितीची कार्यकक्षा निश्चित करण्यात आली आहे.

### त नवीन अधिनियमांची शिफारस

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६मध्ये बदल करण्यात येणार आहेत. त्यासाठी माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली नऊ सदस्यांची समिती नियुक्त करण्यात आली असून, केंद्र सरकारच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०शी सुसंगत नवीन अधिनियमांची शिफारस करण्यासाठी तीन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे.

## नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाबाबत सविस्तर माहिती

# नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाबाबत आयुक्तांचे ‘स्पष्टीकरण’!

### महानगरपालिकेत आयुक्तांनी घेतली स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींची बैठक

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महापालिका मुळा, पवना आणि इंद्रायणी नदी पुनरुज्जीवन प्रकल्प करीत आहे. परंतु मुळा नदी पुनरुज्जीवन प्रकल्प, पवना नदी पुनरुज्जीवन प्रकल्प आणि इंद्रायणी नदी पुनरुज्जीवन प्रकल्प हे तिन्ही ‘प्लॅन’ खूप वेगवेगळे आहेत. नदीचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी हा प्रकल्प करणे आवश्यक आहे. त्या दृष्टिनेच महानगरपालिकेने नियोजन केले आहे,’ असे स्पष्टीकरण आयुक्त शेखर सिंह यांनी पर्यावरण प्रेमी सामाजिक संस्थांना दिले.**




पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मुळा, पवना, इंद्रायणी नदी पुनरुज्जीवन प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पाला पर्यावरण प्रेमींकडून जोरदार विरोध होत आहे. प्रकल्पावरून शहरात गेल्या काही दिवसात साखळी आंदोलन, मोर्चा तसेच निवेदने देऊन प्रकल्पाला विरोध नोंदवला जात आहे. प्रकल्पाबाबत सविस्तर माहिती देण्यासाठी पिंपरी चिंचवड पालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी पर्यावरण विषयावर काम करणाऱ्या विविध स्वयंसेवी संस्थांची बैठक महानगरपालिकेमध्ये घेतली. १६ एप्रिल रोजी झालेल्या या बैठकीत नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाविषयी सविस्तर चर्चा झाली. अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे , मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, उप आयुक्त अण्णा बोदडे, उमेश ढाकणे, कार्यकारी अभियंता हरविंद सिंग बन्सल तसेच शहरामध्ये पर्यावरण विषयावर काम करणाऱ्या विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी या बैठकीला उपस्थित होते.

आयुक्त शेखर सिंह यांनी बैठकीच्या सुरुवातीला नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाबाबत माहिती दिली. नदी पुनरुज्जीवन प्रकल्प उद्देश, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प याबाबत माहिती दिली. ते म्हणाले, ‘पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही महाराष्ट्रातील पहिली महापालिका आहे, जी ड्रेनेज इको सिस्टिमवर काम करीत आहे. ड्रेनेज मास्टर प्लॅन तयार करण्यापूर्वी महानगरपालिकेने शहरातील ड्रेनेज लाईन, चेंबर, सध्या कार्यरत असणारे एसटीपी अशा विविध बाबींचा सर्व्हे पूर्ण केला आहे. त्यानंतर ड्रेनेज मास्टर प्लॅन तयार केला आहे. यामध्ये पुढील दहा वर्षांतील शहरातील परिस्थिती काय असेल, याचा विचार करून एसटीपी प्लॅन केले आहेत,’ असेही आयुक्त सिंह यांनी स्पष्ट केले. ‘पिंपरी चिंचवड महानगरपालिका मुळा, पवना आणि इंद्रायणी नदी पुनरुज्जीवन प्रकल्प करीत आहे. परंतु मुळा नदी पुनरुज्जीवन प्रकल्प, पवना नदी पुनरुज्जीवन प्रकल्प आणि इंद्रायणी नदी पुनरुज्जीवन प्रकल्प हे तिन्ही प्लॅन खूप वेगवेगळे आहेत. नदीचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी हा प्रकल्प करणे आवश्यक आहे. त्यादृष्टिनेच महानगरपालिकेने नियोजन केले आहे,’ असेही बैठकीमध्ये आयुक्त सिंह यांनी सांगितले.

### नदी पुनरुज्जीवन प्रकल्पात स्वयंसेवी संस्थांच्या सूचनांची दखल

यावेळी नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाबाबत सादरीकरण (पीपीटी) करण्यात आले, व त्याबाबत स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींचे नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाबाबत असणारे मत जाणून घेतले. या प्रकल्पाबाबत स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नांवर आयुक्त शेखर सिंह यांनी महानगरपालिकेची भूमिका विषद केली. तसेच स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींच्या सूचनांची योग्य ती दखल घेण्यात येणार असल्याचे ते म्हणाले.

“ नदी पुनरूज्जीवन प्रकल्पाबाबत विविध स्वयंसेवी संस्थांची प्रतिनिधींचे काही प्रश्न होते. या प्रश्नांच्या अनुषंगाने बैठकीत सविस्तर चर्चा झाली आहे. नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचे उद्देश व त्या अनुषंगाने करण्यात येणारे काम याबाबतचे सादरीकरण देखील बैठकीत करण्यात आले आहे. तसेच स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींकडून आलेल्या सूचनांचा देखील नोंद घेतली आहे.

**–महेश लांडगे,**
शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

---

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते क्रांतीवीर चापेकर स्मारकाचे लोकार्पण!

### पिंपरी महापालिका, क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीच्या माध्यमातून उभारणी

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महपालिकेच्या वतीने आणि क्रांतीवीर चापेकर स्मारक समितीच्या सहकार्याने उभारण्यात आलेल्या क्रांतीवीर चापेकर स्मारकाचे लोकार्पण व राष्ट्रीय संग्रहालयाच्या कामाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे.**

या कार्यक्रमासाठी केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची विशेष उपस्थिती असणार आहे. तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार हे भूषवणार असल्याची माहिती पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली.

चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे शुकवारी (१८ एप्रिल ) रोजी सकाळी पावणेदहा वाजता होणाऱ्या या कार्यक्रमास राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील,




क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. याव्यतिरिक्त खासदार मेधा कुलकर्णी, सुनेत्रा पवार, सुप्रिया सुळे, श्रीरंग आप्पा बारणे, डॉ. अमोल कोल्हे, आमदार अरूण लाड, उमा खापरे, जयंत आसगावकर, योगेश टिळेकर, अमित गोरखे, दिलीप वळसे पाटील, भीमराव तापकीर, विजय शिवतारे, महेश लांडगे, राहुल कुल, बापूसाहेब पठारे, सुनिल कांबळे, चेतन तुपे, शरद सोनवणे, सिद्धार्थ शिरोळे, सुनिल शेळके, बाबाजी काळे, हेमंत रासणे, शंकर मांडेकर, शंकर जगताप, ज्ञानेश्वर कटके यांची उपस्थिती असणार आहे. तसेच क्रांतीवीर चापेकर स्मारक समितीचे अध्यक्ष पद्मश्री गिरीश प्रभुणे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर हे देखील या कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.

चिंचवड येथे उभारण्यात आलेले हुतात्मा चापेकर स्मारक क्रांतिकारक चापेकर बंधूंच्या भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाची आठवण करून देणारे स्थळ आहे. सन १८९७ मध्ये प्लेगच्या नियंत्रणासाठी नेमलेल्या ब्रिटीश अधिकारी वॉल्टर चार्ल्स रँड यांचा वध केल्यामुळे हे बंधू ओळखले जातात.

### स्मारकासाठी 13 कोटी 52 लाखांचा खर्च

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आणि क्रांतीवीर चापेकर स्मारक समितीच्या सहकार्याने उभारण्यात आलेल्या क्रांतीवीर चापेकर स्मारकासाठी सुमारे १३ कोटी ५२ लाख रुपये खर्चाची निविदा काढण्यात आली आहे. या स्मारकामध्ये ३०० चौरस मीटर क्षेत्रफळाचा दोन मजली पारंपारिक लाकडी वाडा जतन करण्यात आला असून यात चापेकर बंधुंच्या कौटुंबिक जीवनाचे विविध चित्रण करण्यात आले आहे. आधुनिक एआर, व्हीआर तंत्रज्ञानाचा वापर करून सजीव अनुभव देणाऱ्या घटनांचे चित्रण देखील करण्यात आले आहे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### संत ‘ तू भगवंताचा आहेस ’ ही जाणीव देतात

आपण कोणतेही कृत्य करीत असताना, ज्याकरिता ते कृत्य आरंभिले ते जसे आपल्या डोळ्यांसमोर असते, त्याप्रमाणे नाम घेताना, आपण नाम कशाकरिता घेतले त्याची अखंड जाणीव असावी. ही जाणीव अखंड ठेवणे, मी भगवंताचा आहे हे जाणणे, याचे नाव अनुसंधान ठेवणे. वास्तविक आपण भगवंताचे आहोतच, पण मी विषयाचा आहे असे भ्रमाने वाटू लागले. संत ‘तू विषयाचा नाहीस, भगवंताचा आहेस’ असे सांगतात. हीच संतांची खरी कामगिरी, आणि याकरिता ते नाम घ्यायला सांगतात. नाम घेणे म्हणजे ‘मी विषयाचा नाही, भगवंताचा आहे’ असे मनाला सांगणे आणि मनात तशी जाणीव उत्पन्न करणे; आणि ही जाणीव टिकविण्याकरिता पुनःपुनः मनाला तेच सांगणे, म्हणजे तेच नाम सतत घेणे. तुम्हाला रामदर्शन पाहिजे म्हणता, पण राम तुम्हाला ओळखता कसा येणार ? रामदर्शन व्हायला रामाचे अंतर काटता आले पाहिजे; रामाला पक्के ओळखता आले पाहिजे. याकरिता अंतःकरणाची पवित्रता पाहिजे; शुद्ध भाव पाहिजे. सर्व काही साधने केली, पण भाव नसेल तर ती व्यर्थ होतात. कालांतराने त्यामुळे भाव उत्पन्न होईल हे खरे. पण भाव ठेवून साधने केली म्हणजे प्राप्ती लवकर होते. नवविधा भक्तीमध्ये सोपी आणि मुख्य भक्ती म्हणजे अर्पण करणे ही होय. आपण सर्वस्वी देवाचे होऊन राहावे म्हणजे आपण जे काही करतो ते सर्व अर्पणच होते. ज्याने त्याने आपले हित ओळखून वागणे हे जरूर आहे. कल्याणाचा मार्ग कुणीही दाखवील, पण त्याप्रमाणे वागणे हे ज्याचे त्याच्याकडे आहे. बंधनाला खरे कारण परिस्थिती नसून आपल्याच मनाची ठेवण हे आहे. कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही काळात आणि वाटेल त्या अवस्थेत घेण्यासारखे एक भगवंताचे नाम तेवढे आहे. आहे त्या परिस्थितीत पूर्ण समाधान राहणे ही देवाची पूर्ण कृपा होय. अग्नीचा उपयोग तो करून घेणाऱ्यावर आहे; तसा देवाचा उपयोग जसा करावा तसा होतो. परमेश्वराच्या ध्यानाने सिद्धी येतात आणि सिद्धी तर त्याज्य; मग परमेश्वराचे ध्यान करूच नये की काय ? तर ध्यान हे सिद्धी मिळविण्याकरिता करू नये. परमेश्वर-प्राप्तीकरिता निष्कामबुद्धीने ध्यान करावे, म्हणजे परमेश्वर सिद्धीचे अडथळे दूर करतो. साधू सिद्धींचा उपयोग कधीही करीत नाहीत; ते परमात्मस्वरूपात मिळून गेलेले असतात. सर्व गोष्टी ते परमात्म्यावर सोपवितात आणि त्याच्या इच्छेनेच केव्हा केव्हा चमत्कार झाल्याचे साधूंच्या चरित्रात दिसते.

बोधवचनः- साधूजवळ कधीही व्यावहारिक गोष्टी मागू नयेत, त्या प्रारब्धावर सोपवाव्यात.



## ‘स्टेट’मेंट

अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक

# ममतांच्या पश्चिम बंगालमधील हिंदूंवरील हल्ले सरकार पुरस्कृत ?




**ममता बॅनर्जी या ज्या पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आहेत, तेथे वक्फ बोर्ड कायद्यानंतर उसळलेला हिंसाचार आठवडा झाला तरी थांबत नाही. येथील हिंदूंवर होणारे जीवघेणे हल्ले, हे सरकार पुरस्कृत आहेत, असा आरोप काही हिंदू संघटनांनी केला असून त्यात बरेच कथ्य आहे !**

### ममता बॅनर्जी मुस्लिमांच्या बाजूने !

केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने संसदेत मंजूर केलेला वक्फ बोर्ड कायदा हा आम्हाला मंजूर नाही आणि तो पश्चिम बंगाल मध्ये लागू होऊ शकत नाही असे उद्गार काढणाऱ्या ममता बॅनर्जी यांनी आपल्या पदाचे भान ठेवायला हवे होते ! राज्यामध्ये पेटलेल्या हिंदू मुस्लिम दंग्यामध्ये त्यांनी पेट्रोल टाकण्याचे काम केले, आणि हिंसाचार भडकला आहे.

### शोधून शोधून हिंदूंना मारहाण..

पश्चिम बंगालमधील दंगेखोर हे तेथील हिंदूंना शोधून शोधून टिपत आहे. आपल्या राहत्या घरातून हिंदूंना बाहेर काढून देशोधडीला लावण्याचा नवा उद्योग तेथील मुस्लिमांनी सुरू केला आहे आणि याला ममता यांच्या सरकारचे पूर्णपणे आशीर्वाद असल्याचे बोलले जाते.

### सर्वाधिक हिंसाचार मुर्शिदाबादमध्ये

मुर्शिदाबाद जिल्ह्यात सुरू झालेल्या आंदोलनाला गेल्या आठवड्यात हिंसक वळण लागले. त्यात काही जणांचा मृत्यू झाला आणि अनेकजण जखमी झाले. घरे, दुकाने आणि पोलिसांच्या वाहनांची तोडफोड करण्यात आली

### घरदार सोडून लोकांचे पलायन..

परिस्थिती इतकी भयानक झाली की शेकडो लोक आपली घरे सोडून जवळच्या जिल्ह्यांमध्ये सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित झाले. राष्ट्रीय मानवी हक्क आयोगालाही या हिंसाचाराची दखल घ्यावी लागली. आता तेथील परिस्थिती नियंत्रणात असली, तरी तणावपूर्ण शांतता आहे. तसेही पश्चिम बंगालमध्ये कायदा आणि सुव्यवस्थेचे प्रश्न अनेकदा राजकीय वक्तव्यात अडकलेले असतात आणि त्याचा परिणाम असा होतो की त्याबाबत जनतेने उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे कधीच मिळत नाहीत.

### हिंसाचाराचे उत्तर कधी मिळणार?

मुर्शिदाबादमध्ये झालेल्या जातीय हिंसाचाराचेही असेच परिणाम होताना दिसत आहेत. या मुद्द्यावर, विरोधी भाजप आणि सत्ताधारी तृणमूल काँग्रेस एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्यात व्यस्त आहेत. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या विधानामुळे हा हिंसाचार उफाळून आला, असा भाजपचा आरोप आहे. त्याचवेळी, हिंसाचार करणाऱ्या लोकांना बाहेरून आणण्यात आले होते, असा सत्ताधारी तृणमूल काँग्रेसचा दावा आहे. याप्रकरणी आता कारवाईचे सत्र सुरू आहे. परंतु प्रश्न असा आहे की, पश्चिम बंगाल सरकार आणि प्रशासनाला मुर्शिदाबाद आणि त्याच्या आसपासच्या भागात अशी परिस्थिती उद्भवू शकते, याचा अंदाज नव्हता का?

### दोन समुदायांमध्ये संघर्षाची भीती

पश्चिम बंगालमध्ये वक्फ सुधारणा कायदा लागू करू देणार नाही, अशी घोषणा करणाऱ्या मुख्यमंत्र्यांना त्यासंदर्भात राज्यात होणाऱ्या घडामोडींची माहिती असावयास हवी होती. मग, यामुळे दोन समुदायांमध्ये संघर्षाची परिस्थिती निर्माण होऊ शकते, हे त्यांना कसे कळले नाही? हिंसाचार करणाऱ्यांना बाहेरून आणले गेले. असे म्हणणे असेल, तर तिथल्या गुप्तचर यंत्रणेला याची माहिती कशी मिळाली नाही, हे आश्चर्यकारक आहे. बाहेरून इतक्या मोठ्या संख्येने लोक तिथे कसे पोहोचले आणि सुरक्षा दलांना त्याचा काहीच पत्ता लागला नाही? या तर्काच्या आधारे सरकार आपली जबाबदारी टाळू शकत नाही. वक्फ दुरुस्ती कायदा हा वादग्रस्त असू शकतो आणि त्याबाबत आपली मते मांडायचा अधिकार दोन्ही बाजूंच्या लोकांना आहे. लोकशाहीच्या चौकटीत आपले म्हणणे मांडून त्याची दखल घेण्यास मार्ग अवलंबणे समर्थनीय नाही. इतर वेळी केंद्र सरकारला राज्यातील घटनांमध्ये हस्तक्षेप करू देणार नाही, अशी भूमिका घेणाऱ्या ममता बॅनर्जी यांनी मुख्यमंत्री जबाबदारी स्वीकारायला हवी. इथे अनेक प्रसंगी, राजकीय वातावरणात, दोन राजकीय प्रत्येक निवडणुकीच्या वेळी पक्षांचे कार्यकर्ते एकमेकांशी भिडताना दिसले आहेत.

### हिंसाचार खोलवर रुजला..

प्रत्येक निवडणुकीच्या वेळी अशी परिस्थिती उद्भवते. इतर वेळीही जनतेच्या मनात भीती कायम राहते. पश्चिम बंगालच्या राजकारणात हिंसाचार इतका खोलवर रुजला आहे की प्रत्येक राजकीय पक्षाला जेव्हा जेव्हा संधी मिळते, तेव्हा तो आपल्या कार्यकर्त्यांना त्यांची ताकद दाखवण्यासाठी आव्हान देताना दिसतो. तेथील अनियंत्रित समाजकंटकांना राजकीय संरक्षण मिळते, हे लपून राहिलेले नाही. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात, धार्मिक बाबतीत परिणाम करणाऱ्या मुद्द्यांवर धोरण आखणे हा एक अतिशय संवेदनशील मुद्दा आहे. कारण काही घटक संसदेत घेतलेल्या निर्णयांचा फायदा घेऊन रस्त्यावर अशांतता निर्माण करू शकतात. अशा कोणत्याही परिस्थितीत सामान्य माणसाच्या हिताला आणि मालमत्तेला धोका पोहोचणार नाही, याची हमी सरकारनेच द्यायला हवी. तिथे कोणतेही कारण चालवून घेतले जाता कामा नये.

### केंद्र - राज्य सरकारमध्ये तणाव?

आता, या आंदोलनाच्या निमित्ताने काही महत्वाचे मुद्दे उपस्थित झाले आहेत आणि त्यावर चर्चा होणे अभिप्रेत आहे. संसदेने संमत केलेला कायदा लागू करण्यास राज्य सरकारे नकार देऊ शकतात का? ममता बॅनर्जी यांच्याप्रमाणेच झारखंड आणि कर्नाटकमधील काही नेत्यांनीही याच आशयाची विधाने केली आहेत. याआधी नागरिकत्व कायद्यालाही विरोध झाला होता आणि त्यानंतर तीन नव्या कृषि कायद्यांनाही प्रक्षोभाला तोंड द्यावे लागल्यानंतर ते मागे घेण्याची नामुष्की केंद्र सरकारवर आली होती. आता लढाई सर्वोच्च न्यायालयात पोहोचलेली असताना निरपराधांची घरे पेटवणारा रस्त्यावरचा धुडगूस राज्य असो वा केंद्र, कोणत्याही सरकारने खपवून घेता कामा नये.

### शेवटी केंद्र सरकारचे वर्चस्व!

देशातील जनतेने बहुमत देऊन केंद्रामध्ये सरकार वसविले आहे आणि या सरकारला सर्व महत्त्वाचे कायदे करण्याचा अधिकार आहे त्यांची अंमलबजावणी कोणत्याही परिस्थितीत राज्यांमध्ये व्हायलाच हवी, हे कोणीतरी ममता बॅनर्जी यांना सांगण्याची वेळ आली आहे, हेच खरे !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# आम्ही बाप चोरला नाही, हृदयात पुजला

## बाळासाहेबांचा व्हिडिओ दाखवत शिंदेंची उद्धव ठाकरेंवर टीका

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचा काल नाशिकमध्ये कार्यकर्ता मेळावा पार पडला. या मेळाव्यात पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, त्यांच्याबरोबर गेलेले आमदार आणि भाजपासह महायुती सरकारवर जोरदार टीका केली. यावेळी ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नाव न घेता, मला दुसऱ्यांचे वडील चोरायची गरज नाही असे म्हटले होते.**



आमदार आदित्य ठाकरे यांनी, “सगळ्या पक्षांना आज हिंदूदय सम्राटांशिवाय पर्याय नाही. पण, काही चोरही माझ्या आजोबांचा फोटो वापरत आहेत. त्यांना त्यांच्या वडिलांचा फोटो वापरायला लाज वाटते”, असे म्हटले होते.आता उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरेंच्या या टीकेला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. पत्रकारांशी बोलताना एकनाथ शिंदे यांनी बाळासाहेब ठाकरे यांचे काही जुने व्हिडिओ दाखवत ठाकरेंना लक्ष केले. यावेळी एकनाथ शिंदे म्हणाले की,“कालही बाप चोरला, बाप चोरला हे रडगाणं चालू होतं. आम्ही बाप चोरला नाही. तो कायम हृदयात पुजला आणि यापुढेही पुजत राहू. पण, तुम्ही पाप झाकण्यासाठी त्यांचा आवाज चोरला, त्यांचे विचार चोरले आणि हे विचार चोरण्याचे पाप आम्ही नाही तुम्ही केले आहे.”दरम्यान एकनाथ शिंदे यांनी यावेळी बाळासाहेब ठाकरे यांचा एक जुना व्हिडिओ दाखवला. त्यामध्ये बाळासाहेब, ते कधीही काँग्रेसबरोबर जाणार नसल्याचे म्हटल्याचे ऐकू येत आहे. याचबरोबर व्हिडिओमध्ये बाळासाहेब असेही म्हणताना ऐकू येते की, जेव्हा काँग्रेसबरोबर जाण्याची वेळ येईल तेव्हा राजकारणातून बाहेर जाईन. एकनाथ शिंदे यांनी पुढे बाळासाहेब ठाकरे यांचा आणखी एक व्हिडिओ दाखवला. त्या व्हिडिओमध्ये बाळासाहेब, “एकनाथ शिंदे यांच्यासारखी माणसं आनंद दिघे यांनी तयार केली आहेत. ते आनंद दिघे यांच्या तालमीत तयार झाले आहेत.”दरम्यान काल नाशिकमध्ये झालेल्या शिवसेनेच्या (उद्धव ठाकरे) कार्यकर्ता मेळाव्यात विशेष व्हिडिओद्वारे बाळासाहेब ठाकरे यांच्या आवाजातील भाषण दाखवण्यात आले. या भषणामध्ये राज्यातील सध्याच्या राजकीय परिस्थितीवर भाष्य करण्यात आहे होते. याचबरोबर यामध्ये एकनाथ शिंदे, त्यांच्याबरोबर गेलेले आमदार, नरेंद्र मोदी आणि भाजपावर जोरदार टीका करण्यात आली आहे.यानंतर पत्रकारांशी बोलताना शिवसेनेचे आमदार आदित्य ठाकरे यांनी, “सगळ्या पक्षांना आज हिंदूदय सम्राटांशिवाय पर्याय नाही. पण, काही चोरही माझ्या आजोबांचा फोटो वापरत आहेत. त्यांना त्यांच्या वडिलांचा फोटो वापरायला लाज वाटते”, असे म्हटले होते.आता उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरेंच्या या टीकेला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. पत्रकारांशी बोलताना एकनाथ शिंदे यांनी बाळासाहेब ठाकरे यांचे काही जुने व्हिडिओ दाखवत ठाकरेंना लक्ष केले. यावेळी एकनाथ शिंदे म्हणाले की,“कालही बाप चोरला, बाप चोरला हे रडगाणं चालू होतं. आम्ही बाप चोरला नाही. तो कायम हृदयात पुजला आणि यापुढेही पुजत राहू. पण, तुम्ही पाप झाकण्यासाठी त्यांचा आवाज चोरला, त्यांचे विचार चोरले आणि हे विचार चोरण्याचे पाप आम्ही नाही तुम्ही केले आहे.”दरम्यान एकनाथ शिंदे यांनी यावेळी बाळासाहेब ठाकरे यांचा एक जुना व्हिडिओ दाखवला. त्यामध्ये बाळासाहेब, ते कधीही काँग्रेसबरोबर जाणार नसल्याचे म्हटल्याचे ऐकू येत आहे. याचबरोबर व्हिडिओमध्ये बाळासाहेब असेही म्हणताना ऐकू येते की, जेव्हा काँग्रेसबरोबर जाण्याची वेळ येईल तेव्हा राजकारणातून बाहेर जाईन

### विचार चोरण्याचे पाप तुम्ही केले

. एकनाथ शिंदे यांनी पुढे बाळासाहेब ठाकरे यांचा आणखी एक व्हिडिओ दाखवला. त्या व्हिडिओमध्ये बाळासाहेब, “एकनाथ शिंदे यांच्यासारखी माणसं आनंद दिघे यांनी तयार केली आहेत. ते आनंद दिघे यांच्या तालमीत तयार झाले आहेत.”दरम्यान काल नाशिकमध्ये झालेल्या शिवसेनेच्या (उद्धव ठाकरे) कार्यकर्ता मेळाव्यात विशेष व्हिडिओद्वारे बाळासाहेब ठाकरे यांच्या आवाजातील भाषण दाखवण्यात आले. या भषणामध्ये राज्यातील सध्याच्या राजकीय परिस्थितीवर भाष्य करण्यात आहे होते. याचबरोबर यामध्ये एकनाथ शिंदे, त्यांच्याबरोबर गेलेले आमदार, नरेंद्र मोदी आणि भाजपावर जोरदार टीका करण्यात आली आहे.

# शेतकऱ्यांच्या अनुदानात ५० कोटींचा गैरप्रकार

## बनावट शेतकऱ्यांची नावे अनुदानाच्या यादीत घुसविण्यात आली

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अतिवृष्टीने झालेल्या पिकांच्या नुकसानीबद्दल शासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या अनुदानात जालना जिल्ह्यात ५० कोटी रुपयांचा गैरप्रकार झाल्याचा आरोप आमदार बबनराव लोणीकर यांनी केला असून, संबंधित अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांना निलंबित करण्याची मागणी केली आहे.**



लोणीकर यांनी सांगितले की, २०२०-२०२१ आणि २०२१-२०२२ या काळात जिल्ह्यात अतिवृष्टी तसेच गारपीट किंवा शेती नाही अशा बनावट शेतकऱ्यांची नावे अनुदानाच्या यादीत घुसविण्यात आली. घुसविण्यात आलेली ही नावे बुलढाणा, बीड आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील आहेत. त्यामुळे यामध्ये मोठा भ्रष्टाचार झालेला आहे. जालना जिल्ह्यातील अंबड, घनसावंगी, भोकरदन आणि बाहेरच्या जिल्ह्यातील व्यक्तींच्या नावावर टाकताना संबंधित तहसीलदारांच्या पासवर्डचा वापर करण्यात आलेला आहे. संबंधित चार तालुक्यांचे तहसीलदार, दोन उपविभागीय अधिकारी, कृषी सहायक, ग्रामसेवक व तलाठी यांच्यावर याप्रकरणी कारवाई झाली पाहिजे, यासंदर्भातील चौकशीसाठी सर्वांना निलंबित केले पाहिजे. यासंदर्भात आपण मुख्यमंत्री आणि कृषिमंत्र्यांकडे तक्रार करणार आहोत, असे आमदार लोणीकर म्हणाले.यासंदर्भात निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांनी माध्यम प्रतिनिधींना सांगितले की, अंबड आणि घनसावंगी तालुक्यातील अनुदान वाटपाबाबत काही तक्रारी आल्या होत्या. प्राथमिक तपासणीत काही तथ्य दिसत असल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबत चौकशीसाठी त्रिसदस्यीय समिती नेमली आहे. सहायक जिल्हाधिकारी पुलकित सिंग, उपजिल्हाधिकारी मनीषा दांडगे आणि नायब तहसीलदार लुणावत यांचा समावेश असलेली ही समिती संबंधित सर्व अभिलेख्यांची तपासणी करीत आहेत. संबंधित कृषी सहायक, ग्रामसेवक आणि तलाठी यांच्या संयुक्त पाहणीनंतर पिकाच्या नुकसानीच्या याद्या अपलोड करताना गैरप्रकार झाला का, याची चौकशी सुरू आहे. अंबड तालुक्यातील ८० गावांतील याद्यांची तपासणी झालेली आहे. समितीचा प्राथमिक अहवाल अद्याप आलेला नाही, असेही महाडिक म्हणाले.लोणीकर यांनी सांगितले की, २०२०-२०२१ आणि २०२१-२०२२ या काळात जिल्ह्यात अतिवृष्टी तसेच गारपीट किंवा शेती नाही अशा बनावट शेतकऱ्यांची नावे अनुदानाच्या यादीत घुसविण्यात आली.

### पासवर्डचा वापर करण्यात आला

घुसविण्यात आलेली ही नावे बुलढाणा, बीड आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील आहेत. त्यामुळे यामध्ये मोठा भ्रष्टाचार झालेला आहे. जालना जिल्ह्यातील अंबड, घनसावंगी, भोकरदन आणि बाहेरच्या जिल्ह्यातील व्यक्तींच्या नावावर टाकताना संबंधित तहसीलदारांच्या पासवर्डचा वापर करण्यात आलेला आहे.

# देवही कमकुवतांच्या बाजूने नसतो!

## हिंदूंनी आता शस्त्र बाळगावी', भाजपा नेत्याच्या आवाहनामुळं वाद

।ओडिशा।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**वक्फ (सुधारणा) विधेयक संसदेत मंजूर झाल्यानंतर पश्चिम बंगालच्या मुर्शिदाबाद येथे हिंसाचार उसळला. या हिंसाचारावर बोलत असताना पश्चिम बंगालमधील भाजपाचे ज्येष्ठ नेते दिलीप घोष यांनी हिंदूंना शस्त्र बाळगण्याचे आवाहन केले आहे. त्यांच्या या विधानावर आता विरोधक जोरदार टीका करत आहेत. सत्ताधारी तृणमूल काँग्रेसने त्यांचे हे विधान प्रक्षोभक असल्याचे म्हटले. घोष यांचा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील एका जाहीर सभेत बोलत असताना दिलीप घोष यांनी हिंदूंना चिथावणी देणारे विधान केले.**



### पोलीस वाचवायला येणार नाही

दरम्यान काही दिवसांपूर्वीच दिलीप घोष यांनी एका कार्यक्रमात महिलेला धमकी दिल्याचेही प्रकरण समोर आले होते. त्यांची यापूर्वीही काही वादग्रस्त विधाने चर्चेत होती. दिलीप घोष हे त्यांच्या मतदारसंघात एका कार्यक्रमाच्या उद्घाटनासाठी होते. यावेळी तेथील काही महिलांनी आमच्या भागात काहीही विकासकामे होत नसल्याचा सवाल केला. तसेच खासदार असताना तुम्ही एकदाही या भागात फिरकला देखील नाहीत असा जाब विचारला. यावेळी घोष यांनी सदर महिलांना असे विधान करत धमकी दिली होती.त्यानंतर दिलीप घोष यांनी माध्यमांशी संवाद साधताना दावा केला की, आंदोलक हे तृणमूल काँग्रेसचे समर्थक होते.

हिंदू टीव्ही, फ्रिज आणि नवीन फर्निचर खरेदी करत आहेत. पण त्यांच्या घरात एकही शस्त्र नाही. जेव्हा काही वेगळे घडते तेव्हा तुम्ही पोलिसांना फोन करत राहता. पण पोलीस तुम्हाला वाचवायला येणार नाही", असे विधान भाजपाचे माजी प्रदेशाध्यक्ष दिलीप घोष यांनी केले. घोष पुढे म्हणाले, "दहा वर्षांपूर्वी कुणालाही रामनवमीची मिरवणूक म्हणजे काय हे माहीत नव्हते. आज प्रत्येक परिसरात अशा मिरवणुका काढल्या जात आहेत. कारण हिंदूंना कळून चुकले आहे की, आता त्यांना एकत्र येण्याची गरज आहे. कारण देवही कमकुवतांच्या बाजूने नसतो."दरम्यान दिलीप घोष यांच्या विधानाचा व्हिडीओ व्हायरल झाला असला तरी त्याची खात्री पटविण्यात आलेली नाही. मात्र त्यांच्या विधानावर तृणमूल काँग्रेसने टीका केली आहे. मुर्शिदाबादचे आमदार हुमायूँ कबीर यांनी घोष यांच्यावर जातीय तेढ निर्माण करण्याचा आरोप केला. भाजपा नेते हिंदूंना भडकवण्यासाठी आणि पश्चिम बंगालमधील संस्कृती बिघडविण्यासाठी धर्माचा वापर करत आहेत, अशी टीका कबीर यांनी केली.दरम्यान काही दिवसांपूर्वीच दिलीप घोष यांनी एका कार्यक्रमात महिलेला धमकी दिल्याचेही प्रकरण समोर आले होते. त्यांची यापूर्वीही काही वादग्रस्त विधाने चर्चेत होती. दिलीप घोष हे त्यांच्या मतदारसंघात एका कार्यक्रमाच्या उद्घाटनासाठी होते. यावेळी तेथील काही महिलांनी आमच्या भागात काहीही विकासकामे होत नसल्याचा सवाल केला. तसेच खासदार असताना तुम्ही एकदाही या भागात फिरकला देखील नाहीत असा जाब विचारला. यावेळी घोष यांनी सदर महिलांना "ओरडू नकोस, नाहीतर मी तुझा गळा दाबून टाकीन", असे विधान करत धमकी दिली होती.त्यानंतर दिलीप घोष यांनी माध्यमांशी संवाद साधताना दावा केला की, आंदोलक हे तृणमूल काँग्रेसचे समर्थक होते. त्यांनी हा निषेध केलेला नाही तर हे ५०० रुपयांसाठी भुंकणारे संधीसाधू आहेत, ते भुंकतात.

दरम्यान, तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांनी दिलीप घोष यांच्या या कृतीचा निषेध केला आणि रस्त्याचे काम पालिकेने केल्याचे पुन्हा सांगितले.हिंदू टीव्ही, फ्रिज आणि नवीन फर्निचर खरेदी करत आहेत. पण त्यांच्या घरात एकही शस्त्र नाही. जेव्हा काही वेगळे घडते तेव्हा तुम्ही पोलिसांना फोन करत राहता. पण पोलीस तुम्हाला वाचवायला येणार नाही", घोष पुढे म्हणाले, "दहा वर्षांपूर्वी कुणालाही रामनवमीची मिरवणूक म्हणजे काय हे माहीत नव्हते. आज प्रत्येक परिसरात अशा मिरवणुका काढल्या जात आहेत. कारण हिंदूंना कळून चुकले आहे की, आता त्यांना एकत्र येण्याची गरज आहे. कारण देवही कमकुवतांच्या बाजूने नसतो."दरम्यान दिलीप घोष यांच्या विधानाचा व्हिडीओ व्हायरल झाला असला तरी त्याची खात्री पटविण्यात आलेली नाही. मात्र त्यांच्या विधानावर तृणमूल काँग्रेसने टीका केली आहे. मुर्शिदाबादचे आमदार हुमायूँ कबीर यांनी घोष यांच्यावर जातीय तेढ निर्माण करण्याचा आरोप केला. भाजपा नेते हिंदूंना भडकवण्यासाठी आणि पश्चिम बंगालमधील संस्कृती बिघडविण्यासाठी धर्माचा वापर करत आहेत.

# वक्फ कायद्यासाठी पंतप्रधान मोदींचे आभार!

## राष्ट्रपतींच्या संमतीनंतर वक्फ कायद्या लागू झाला

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**वक्फ दुरुस्ती कायद्यावरून देशभरात राजकारण तापले आहे. मोदी सरकार मुस्लिमांच्या कल्याणासाठी हा कायदा आवश्यक असल्याचे म्हणत असताना, काँग्रेससह अनेक विरोधी पक्ष आणि अनेक मुस्लिम संघटना वक्फ सुधारणा कायदा मुस्लिमांच्या विरोधात असल्याचे म्हणत आहेत.**



### वक्फच्या घटनात्मक वैधतेला आव्हान

वक्फ कायद्याच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या एकूण १० याचिका सर्वोच्च न्यायालयात सूचीबद्ध आहेत.हा कायदा आवश्यक असल्याचे म्हणत असताना, काँग्रेससह अनेक विरोधी पक्ष आणि अनेक मुस्लिम संघटना वक्फ सुधारणा कायदा मुस्लिमांच्या विरोधात असल्याचे म्हणत आहेत.

वक्फ सुधारणा कायद्याविरुद्धच्या याचिकांवरही सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. अशात दुसरीकडे, दाऊदी बोहरा समुदायाच्या लोकांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेत वक्फ सुधारणा कायद्याबद्दल त्यांचे आभार मानले आहेत. आज गुरुवारी, दाऊदी बोहरा समुदायाच्या शिष्टमंडळाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली आणि वक्फ सुधारणा कायद्याबद्दल त्यांचे आभार मानले. त्यांनी सांगितले की, ही समुदायाची दीर्घकाळापासूनची मागणी होती.यावेळी शिष्टमंडळाने पंतप्रधानांच्या "सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास" या धोरणावर विश्वास व्यक्त केला आणि सर्व समुदायांच्या प्रगतीला लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले. त्यांनी देशात होत असलेल्या सकारात्मक बदलांचे कौतुकही केले. पंतप्रधान मोदींनी दाऊदी बोहरा समुदायाच्या योगदानाचे कौतुक केले आणि सांगितले की, सरकार प्रत्येक समुदायाच्या विकासासाठी वचनबद्ध आहे.वक्फ (सुधारणा) कायदा, २०२५ संसदेने मंजूर केला असून, राष्ट्रपतींच्या संमतीनंतर तो लागू झाला आहे. पण, सर्वोच्च न्यायालयाने त्यातील काही तरतूदींवर अंतरिम स्थगिती दिली आहे. हे प्रकरण सध्या सर्वोच्च न्यायालयात आहे. न्यायालयाने केंद्र सरकारकडून उत्तर मागितले असून, यासाठी सात दिवसांची मुदत दिली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता ५ मे रोजी होणार आहे. वक्फ कायद्याला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात आज सलग दुसऱ्या दिवशी सुनावणी झाली. गुरुवारी झालेल्या सुनावणीदरम्यान, सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी उत्तर दाखल करण्यासाठी न्यायालयाकडे ७ दिवसांचा वेळ मागितला. पुढील सुनावणीपर्यंत वक्फ बोर्ड किंवा वक्फ कौन्सिलमध्ये कोणताही सदस्याची नियुक्ती केली जाणार नाही, असे सॉलिसिटर जनरल यांनी आश्वासन दिले.सुनावणी दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, हा खटला आता अंतरिम आदेशासाठी सूचीबद्ध केला जाईल. न्यायालयाने म्हटले की, इतक्या याचिकांवर सुनावणी करणे अशक्य आहे.

# ‘गोलमाल 5’ चित्रपटाच्या प्रदर्शनाबद्दल रोहित शेट्टीचे मोठे विधान

बॉलीवूडमध्ये काही चित्रपट असे आहेत, ज्यांचा वेगळा चाहता वर्ग आहे. त्यापैकी ‘गोलमाल’ हा चित्रपट आहे. या चित्रपटाचे चार भाग आतापर्यंत आले आहेत आणि गोलमाल सीरिजच्या चारही भागांनी प्रेक्षकांचे भरभरून मनोरंजन केले आहे. आता ‘गोलमाल ५’ हा चित्रपट कधी येणार, याची प्रेक्षकांना उत्सुकता लागलेली आहे. आता चित्रपटाचा दिग्दर्शक रोहित शेट्टीने यावर मोठे वक्तव्य केले आहे.रोहित शेट्टीने नुकतीच ‘पिंकविला’ला मुलाखत दिली. या मुलाखतीमध्ये रोहित शेट्टीने ‘गोलमाल ५’ या चित्रपटाबद्दल वक्तव्य केले आहे. तो म्हणाला, “गोलमाल सीरिज कायम बनत राहील. चित्रपट बनणार नाही, असे होणार नाही. या चित्रपटावर काम सुरू आहे. मात्र, त्यासाठी अजून वेळ लागेल.” याआधी दिलेल्या एका मुलाखतीत त्याने म्हटले होते की, येत्या दोन वर्षांत तुम्हाला ‘गोलमाल ५’ चित्रपट पाहायला मिळेल. हा चित्रपट आधीच्या चित्रपटांपेक्षा वेगळा असेल. हा कॉमेडी चित्रपट असून तो मी ॲक्शन चित्रपटांसारखा बनवू शकत नाही. या चित्रपटाचा खास चाहतावर्ग असून त्यांच्यासाठी ही सीरिज कायम सुरू राहणार, असं तो म्हणाला होता.२००६ साली ‘गोलमाल फन अनलिमिटेड’ हा चित्रपट आला होता.



## ती मला तिचा आधारस्तंभ मानते

बॉलीवूड अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा गेल्या काही दिवसांपासून तिच्या विवाहामुळे मोठ्या चर्चेत आहे. तिने झहीर इक्बालबरोबर लग्नगाठ बांधली असून तिने लग्न करणार असल्याचे जाहीर केल्यापासून ती मोठ्या चर्चेत होती. आंतरधर्मीय लग्न करत असल्यामुळे तिच्यावर मोठी टीका करण्यात आली होती. याबरोबरच सोनाक्षी आणि संपूर्ण सिन्हा कुटुंबाविरुद्ध मोर्चेदेखील काढल्याचे पाहायला मिळाले होते.सोनाक्षी आणि झहीरने नुकतीच ‘गल्लाटा इंडिया’ला मुलाखत दिली. या मुलाखतीदरम्यान या जोडप्याने शत्रुघ्न सिन्हा यांचा एक व्हिडीओ दाखवला आहे. या व्हिडीओमध्ये शत्रुघ्न सिन्हांनी आपल्या मुलीच्या लग्नाबद्दल भावना व्यक्त केल्या आहेत. त्यांनी म्हटले आहे की, सोनाक्षी आणि झहीर हे एकमेकांसाठी बनलेले आहेत. लोकांनी काहीही म्हणण्याचा प्रयत्न केला, मात्र आमच्यासाठी आमच्या मुलांचा आनंद सर्वोच्च आहे. विशेष म्हणजे आमच्या मुलीचा आनंद आमच्यासाठी महत्त्वाचा आहे. आम्हाला वाटतं की, ती आनंदी आहे आणि कायम आनंदी राहील. तिने काहीच असंवैधानिक किंवा कायद्याच्या विरुद्ध केलेले नाही. पालक आपल्या मुलांसाठी खूप काही करतात आणि मुलीसोबत खंबीरपणे उभे राहणे हा छोटा वाटा आहे. तिच्या निर्णयांमध्ये आणि आनंदामध्ये मी कायमच तिच्या पाठीशी खंबीरपणे उभा असेन, असे सोनाक्षीने दाखवलेल्या व्हिडीओ क्लीपमध्ये त्यांनी म्हटले आहे.

## सायकलने शाळेत जायची परिणिती



परिणिती चोप्रा सध्या तिच्या लग्नामुळे चर्चेत आहे. यादरम्यान, तिच्याशी संबंधित एक व्हिडिओ चर्चेत आहे, त्यात तिने सांगितले की, जेव्हा ती लहान होती तेव्हा त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती. व्हिडिओमध्ये एका मुलीच्या फेसबुक पोस्टचे स्क्रीनशॉट देखील आहेत, त्यात तिने परिणितीच्या म्हणण्याला पूर्णपणे नकार दिला आहे. परिणितीने सांगितलेल्या सर्व गोष्टी खोट्या असल्याचे ती म्हणाली. आजच्या प्रमाणे त्या काळातही परिणितीची कौटुंबिक पार्श्वभूमी खूप मजबूत होती, असे तिने म्हटले आहे. व्हिडिओ समोर येताच यूजर्स त्याला जोरदार ट्रोल करत आहेत. लोक म्हणतात की परिणीतीने सहानुभूतीसाठी खोट्या गोष्टी सांगितल्या. कियारा-सिद्धार्थसारखे जयमालाचे फंक्शन केल्यामुळे लोक तिला प्रचंड ट्रोल करत आहेत. हा व्हिडिओ 2017 च्या मार्शल आर्ट इव्हेंटमधील आहे. या कार्यक्रमात दिलेल्या मुलाखतीत परिणिती म्हणाली होती की, वाढत्या वयाबरोबर मी आणि माझे भाऊ दोघांनीही अनेक आव्हानांचा सामना केला आहे. त्यावेळी आमच्याकडे जास्त पैसे नव्हते. यासाठी मी सायकलने शाळेत जायचे. बस किंवा कारने जाणेही शक्य नव्हते. त्यावेळी आमच्याकडे गाडीही नव्हती. व्हिडिओमध्ये एका मुलीच्या फेसबूक पोस्टचे स्क्रीनशॉटही आहेत. त्या मुलीने स्वतःला परिणीतीची मैत्रीण असल्याचे सांगितले आहे. अशा खोट्या गोष्टी सांगताना लाज वाटली पाहिजे, असे त्यांनी लिहिले आहे. उच्च समाजातून आलेली असूनही ती कॅमेऱ्यासमोर पडून होती. मला वाटते की प्रत्येक सेलिब्रिटी असेच करतो. सहानुभूतीसाठी तो म्हणाला की त्याच्याकडे गाडी नाही आणि पैसे नाहीत. आम्ही दोघे एकाच शाळेत शिकलो. मला आठवते तिच्या वडिलांकडे गाडी होती. त्याकाळी सायकल चालवण्याचा ट्रेंड असल्यामुळे ती कारऐवजी सायकलने शाळेत यायची. त्यावेळी अनेकांकडे सायकलीही नव्हत्या हेही लक्षात घेण्यासारखे आहे. परिणीतीचा हा व्हिडिओ REDDIT साइटवर उपलब्ध आहे. या व्हिडिओवर कमेंट करताना एका चाहत्याने लिहिले होते की, परिणिती नेहमीच थ्रो करत असते. त्यांच्याबद्दल काहीही योग्य नाही. मी भेदभाव करत आहे, असे वाटू शकते परंतु ते खरे आहे की त्यांनी कियारा आणि सिडच्या लग्नाची एन्ट्री देखील कॉपी केली आहे. 17 व्या वर्षी शिक्षणासाठी यूकेला गेल्यावर ती गरीब कशी असेल? दुसऱ्या यूझरने उपरोधिकपणे लिहिले की, बिचारी परिणीती सायकलवरून शाळेत

## अभिषेकच्या कारचे ऐश्वर्या रायशी कनेक्शन

मुंबईत सध्या पावसाची संततधार आहे. याच पावसात अभिषेक बच्चन (ABHISHEK BACHCHAN) फिरायला बाहेर पडला, पण त्याच्याबरोबर पत्नी ऐश्वर्या राय बच्चन व मुलगी आराध्या नव्हते तर तो भाचा अगस्त्य नंदाबरोबर बाहेर पडला होता. अभिषेक व अगस्त्यबरोबर किंग खानची लाडकी लेक सुहानादेखील होती. बऱ्याच काळापासून सुहाना व अगस्त्य एकमेकांना डेट करत असल्याचं म्हटलं जात आहे, अशातच आता त्यांचा हा फोटो चर्चेत आहे. मंगळवारी रात्री अभिषेक बच्चन त्याच्या नवीन काळ्या कारमध्ये पापाराझींच्या कॅमेऱ्यात कैद झाला. यावेळी त्याच्याबरोबर बहीण श्वेता बच्चनचा मुलगा अगस्त्य नंदा, मुलगी नव्या नवेली नंदा आणि शाहरुख खानची मुलगी सुहाना खानही होते. अगस्त्य आणि सुहाना डेट करत असल्याच्या अफवा आहेत. या व्हिडीओने नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. योगेन शाह नावाच्या अकाउंटवरून फोटो शेअर करण्यात आले आहेत.सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या फोटोंमध्ये अभिषेक बच्चन एका मोठ्या काळ्या कारमध्ये ड्रायव्हर सीटवर बसलेला दिसतो. तर त्याच्या शेजारच्या सीटवर त्याचा भाचा अगस्त्य नंदा बसला आहे.

## जान्हवी कपूरचा आजारपणाबाबत मोठा खुलासा



बॉलीवूडचे कलाकार हे नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असतात. कधी त्यांच्या चित्रपटांच्या निमित्ताने, कधी सोशल मीडियावरील पोस्टमुळे, तर कधी त्यांच्या वक्तव्यामुळे हे कलाकार चर्चांचा भाग बनतात. बॉलीवूड अभिनेत्री जान्हवी कपूर सध्या आजारपणाबाबत केलेल्या वक्तव्यामुळे मोठ्या चर्चेत आहे.‘टाइम्स नाऊ’ला दिलेल्या मुलाखतीत जान्हवीने आपल्या आजारपणाबद्दल खुलासा केला आहे. या मुलाखतीत तिने सांगितले की, मी इतकी आजारी पडले होते की, मला दवाखान्यात ॲडमिट करावं लागलं. माझी प्रतिकारशक्ती खूप कमी झाली होती. ‘मिस ॲण्ड मिसेस माही’ या चित्रपटाचे प्रमोशन सुरू होण्याआधीपासूनच ती सतत काम करत होती. यादरम्यान, मी सतत प्रवासदेखील करत होते, शूटिंग सुरू होते. या संपूर्ण महिन्यात मी खूप थकून गेले होते. ती पुढे म्हणते की, मी एका कार्यक्रमासाठी चेन्नईला गेले होते. तिथून परतल्यावर मला अस्वस्थ वाटत होते. त्यामुळे मी घरीच राहण्याचा निर्णय घेतला आणि कामाचे वेळापत्रक बदलले. मात्र, गुरुवारी प्रकृती खालावली. सुरुवातीला असे वाटत होते, काहीतरी भेसळयुक्त पदार्थ खाल्ला गेला असावा आणि त्यामुळे मला आजारी पडल्यासारखे वाटत आहे. पण, जेव्हा रक्ताची चाचणी केली तेव्हा तर ते वेगळीच बाब समोर आली होती. तिची पचनशक्ती चांगली झाली; मात्र तिला तीव्र अंगदुखी, अशक्तपणाचा सामना करावा लागला. मला माझ्या रोजच्या गोष्टी करण्यात अडचणी येत होत्या, त्यासाठी मला कोणाची तरी मदत घ्यावी लागत होती. त्यामुळे अपंगत्व आल्यासारखे वाटत होते.

# मुंबईने मिळवला सलग दुसरा विजय!

## एका धावेसाठी 2 विकेट्स अन् लागलं संपूर्ण षटक!



। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**मुंबई इंडियन्सने घरच्या मैदानावर झालेल्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादचा शानदार पराभव करत यंदाच्या मोसमातील सलग दुसरा विजय नोंदवला आहे. तिलक वर्माचा चौकारासह मुंबईने हैदराबादचा ४ विकेट्सने पराभव केला आहे. मुंबई इंडियन्सला सनरायझर्स हैदराबादने विजयासाठी १६३ धावांचे आव्हान दिले होते.**

मुंबई इंडियन्सने हे आव्हान १८.१ षटकांत १६६ धावा केल्या. या विजयानंतरही मुंबईचा संघ सातव्या स्थानीच असणार आहे. तर हैदराबादचा संघ ९व्या स्थानी आहे.१८व्या षटकात मोठा ड्रामा पाहायला मिळाला. मुंबईला विजयासाठी २ धावांची गरज असताना तिलकने एक धाव घेत हार्दिकला स्ट्राईक दिली. हार्दिक पुढच्या चेंडूवर झेलबाद झाला. तर नमन धीर दोन चेंडूवर एकही धाव काढू शकला नाही. तर पाचव्या चेंडूवर नमन धीर पायचीत झाला. तर अखेरच्या चेंडूवर सँटनर एक धाव घेण्यात अपयशी ठरला. अखेरीस तिलक वर्माने १९व्या षटकात झीशान अन्सारीच्या पहिल्या चेंडूवर चौकार लगावत संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.हैदराबादने दिलेल्या १६३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबईने झटपट सुरूवात केली. विशेषतः रोहित शर्माने वानखेडेवर ३ षटकार लगावत उपस्थित असलेल्या चाहत्यांची मनं जिंकली. पण पुन्हा एकदा, रोहित (२६) त्याच्या डावाचे मोठ्या धावसंख्येत रूपांतर करण्यात अपयशी ठरला. रायन रिकेल्टन (३१) ने काही मोठे फटके मारले आणि त्यानंतर सूर्यकुमार यादवने २ चौकार २ षटकार लगावत २६ धावांची खेळी केली.दरम्यान, विल जॅक्सनेही संघाच्या धावसंख्येत मोठी भर घातली. विल जॅक्स २६ चेंडूत २ षटकार आणि ३ चौकारांसह ३६ धावा करत बाद झाला. सूर्या आणि विलने २९ चेंडूत ५२ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी रचली. तर पॅट कमिन्सने (३/२६) दोन्ही विकेट घेऊन पुनरागमनाच्या आशा निर्माण केल्या असल्या तरी, तोपर्यंत खूप उशीर झाला होता. हार्दिक पंड्या (२१) आणि तिलक वर्मा (१७) यांनी संघाला विजय मिळवून दिला.वादळी फलंदाजी करणाऱ्या सनरायझर्स हैदराबाद संघाला मुंबई इंडियन्सच्या गोलंदाजीसमोर मोठी धावसंख्या उभारता आली नाही. अभिषेक शर्मा आणि ट्रॅव्हिस हेड या स्फोटक सलामी जोडीला चौकार आणि षटकार मारण्यासाठी संघर्ष करावा लागला. अभिषेकने तरीही काही छान फटके मारून ४० धावांची खेळी करत संघाला जलद सुरुवात देण्याचा प्रयत्न केला, पण हेड त्याच्या संपूर्ण डावात संघर्ष करत राहिला आणि २८ धावा करत माघारी परतला. परिणामी १० षटकांत फक्त ७५ धावा काढता आल्या आणि १५ षटकांत फक्त १०५ धावा करण्यात हैदराबादचा संघ यशस्वी झाला. हेनरिक क्लासेन (३७) ने वेग थोडा वाढवला आणि १८ व्या षटकात २१ धावा फटकावल्या. त्यानंतर २० व्या षटकात, हैदराबादने हार्दिक पंड्याच्या ३ षटकारांसह २२ धावा काढत १६२ धावांचा टप्पा गाठला. मुंबई इंडियन्सकडून वि जॅक्सने सर्वाधिक २ विकेट्स घेतले. विल जॅक्सला त्याच्या या सामन्यातील अष्टपैलू कामगिरीसाठी सामनावीराचा पुरस्कार मिळाला.मुंबई इंडियन्सने हे आव्हान १८.१ षटकांत १६६ धावा केल्या. या विजयानंतरही मुंबईचा संघ सातव्या स्थानीच असणार आहे. तर हैदराबादचा संघ ९व्या स्थानी आहे.१८व्या षटकात मोठा ड्रामा पाहायला मिळाला. मुंबईला विजयासाठी २ धावांची गरज असताना तिलकने एक धाव घेत हार्दिकला स्ट्राईक दिली. हार्दिक पुढच्या चेंडूवर झेलबाद झाला. तर नमन धीर दोन चेंडूवर एकही धाव काढू शकला नाही.

### हेड संपूर्ण डावात संघर्ष करत राहिला

तर पाचव्या चेंडूवर नमन धीर पायचीत झाला. तर अखेरच्या चेंडूवर सँटनर एक धाव घेण्यात अपयशी ठरला. अखेरीस तिलक वर्माने १९व्या षटकात झीशान अन्सारीच्या पहिल्या चेंडूवर चौकार लगावत संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.हैदराबादने दिलेल्या १६३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबईने झटपट सुरूवात केली. विशेषतः रोहित शर्माने वानखेडेवर ३ षटकार लगावत उपस्थित असलेल्या चाहत्यांची मनं जिंकली. पण पुन्हा एकदा, रोहित (२६) त्याच्या डावाचे मोठ्या धावसंख्येत रूपांतर करण्यात अपयशी ठरला. रायन रिकेल्टन (३१) ने काही मोठे फटके मारले आणि त्यानंतर सूर्यकुमार यादवने २ चौकार २ षटकार लगावत २६ धावांची खेळी केली.दरम्यान, विल जॅक्सनेही संघाच्या धावसंख्येत मोठी भर घातली. विल जॅक्स २६ चेंडूत २ षटकार आणि ३ चौकारांसह ३६ धावा करत बाद झाला.

# हेनरिक क्लासेनच्या ग्लोव्हजमुळे नो बॉल

## क्लासेनचे ग्लोव्हज विकेटच्या पुढे आले आणि हाच नो बॉल ठरला




। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आज आयपीएल २०२५ मध्ये मुंबई इंडियन्स वि. सनरायझर्स हैदराबाद यांच्यात खेळवला जात आहे. या सामन्यात हैदराबादने प्रथम फलंदाजी करत १६३ धावांचे मुंबईला विजयासाठी आव्हान दिले आहे. मुंबईकडून रोहित शर्मा आणि रायन रिकल्टनची जोडी मैदानात उतरली होती. रोहित २६ धावा करत बाद झाला. मात्र रिकल्टनच्या विकेटवर मोठा गदारोळ पाहायला मिळाला.**

रायन रिकल्टन २१ धावा करत खेळत होता. तितक्यात पॉवरप्लेनंतर झीशान अन्सारी गोलंदाजीला आला. त्याने चौथ्या चेंडूवर रिकल्टनला झेलबाद केलं. झीशानने आपल्या गोलंदाजीने रिकल्टनला त्रास दिला होता, तो लवकरच बाद होईल अशी चित्र होती आणि तो झेलबाद झाला. पण चौथ्या पंचांनी मोठा ट्विस्ट आणला. रिकल्टन बाद होऊन मैदानाबाहेर गेला आणि तितक्यात त्याला मैदानावर बोलवण्यात आलं.पंचांचा निर्णय पाहून सर्वच जणांना धक्का बसला. पॅट कमिन्सने कव्हरवर फिल्डिंग करताना एक कमालीचा झेल टिपला.

पण पंचांनी नो बॉल म्हणत रिकल्टनला मैदानावर बोलावलं होतं. पण झीशानने ना लाईन क्रॉस केली होती, ना बॅकफूट नो बॉल होता. गोलंदाजीच्या टोकावरून नाही तर फलंदाजीच्या टोकावरून ही चूक झाली होती. हेनरिक क्लासेन विकेटकिपिंग करताना विकेट्सच्या जवळ किपिंग करत होता. किपिंग करता करता क्लासेनचे ग्लोव्हज विकेटच्या पुढे आले आणि हाच नो बॉल ठरला.नियम २७.३.१ नुसार, जर यष्टीरक्षकाने चेंडू स्टंपसमोर किंवा स्टंपच्या रेषेत फलंदाजाने खेळण्यापूर्वी किंवा फलंदाजाच्या शरीराला स्पर्श करण्यापूर्वी जर ग्लोव्हज विकेटच्या पुढे आणले तर पंच नो बॉल सिग्नल करू शकतो. क्लासेनच्या दिशेने चेंडू न आल्याने त्याला पुढे येऊन चेंडू टिपण्याची गरज नव्हती. पण तरीही त्याचे ग्लोव्हज स्टंपच्या रेषेत होते.रायन रिकल्टन २१ धावा करत खेळत होता.

तितक्यात पॉवरप्लेनंतर झीशान अन्सारी गोलंदाजीला आला. त्याने चौथ्या चेंडूवर रिकल्टनला झेलबाद केलं. झीशानने आपल्या गोलंदाजीने रिकल्टनला त्रास दिला होता, तो लवकरच बाद होईल अशी चित्र होती आणि तो झेलबाद झाला. पण चौथ्या पंचांनी मोठा ट्विस्ट आणला.

### पंचांचा निर्णय पाहून धक्का

रिकल्टन बाद होऊन मैदानाबाहेर गेला आणि तितक्यात त्याला मैदानावर बोलवण्यात आलं.पंचांचा निर्णय पाहून सर्वच जणांना धक्का बसला. पॅट कमिन्सने कव्हरवर फिल्डिंग करताना एक कमालीचा झेल टिपला. पण पंचांनी नो बॉल म्हणत रिकल्टनला मैदानावर बोलावलं होतं. पण झीशानने ना लाईन क्रॉस केली होती, ना बॅकफूट नो बॉल होता.

# ग्रामीण भागातील तरुण ते शॉर्ट फिल्म मेकर!

## सातारा जिल्ह्यातील कुडाळ गावच्या गणेश धोत्रेची अनोखी 'स्टोरी '

**वेग, वेळ आणि अचूकता यांचे अनोखे मिश्रण हे शॉर्ट फिल्म मध्ये असते. शॉर्ट फिल्म अर्थात लघुपट आपल्याला अत्यंत जवळचे वाटतात. कारण त्यातील कथा ही आपल्या अवतीभवती घुटमळत असते. त्यामध्ये रोजच्या जगण्यातले जीवन सामावलेले असते. ग्रामीण भागात अशा गोष्टी पदोपदी जाणवतात. याच स्टोरीज हेरून त्यांना साचेबद्ध करून जगासमोर मांडण्याचा यशस्वी प्रयत्न सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यातील कुडाळ गावच्या गणेश धोत्रे या तरुणाने केला आहे. गणेशच्या या प्रयत्नांना यशस्वी रूप देखील मिळाले आहे आणि अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पुरस्काराने ही त्याला गौरविण्यात आले आहे.**



ग्रामीण भागातील तरुणांना एखाद्या गोष्टीकडे पाहण्याचा दृष्टिकोन असतो असे सांगून गणेश म्हणतो माझे शिक्षण बारावी सायन्स नंतर इंग्लिश विषयात बी ए झालं आहे . गणेशला कलाक्षेत्राची आवड होती.

त्याला डान्स मध्ये करिअर करायचे होते. डान्सच्या या करिअरसाठी सातारा जिल्हा सोडून पुण्यामध्ये येण्याचे धाडस गणेशने केले. पुण्यातील ऐश्वर्या काळे आणि धनेश गुजर त्यांच्या डान्स अकॅडमी मध्ये प्रवेश केला तिथे नृत्य प्रशिक्षण घेतले. गर्जा महाराष्ट्र लोकधारा या कार्यक्रमाचे महाराष्ट्रभर दौरे केले.

नृत्याचे प्रशिक्षण घेत असताना. शॉर्ट फिल्म बनवण्याची आवड मात्र मनात कायम होती. याचमुळे 2017 मध्ये नागराज मंजुळे आयोजित विवेक नॅशनल शॉर्ट फिल्म फेस्टिवल मुंबई इथं आयोजित झालेल्या फिल्म फेस्टिवलमध्ये निलेश महिगावकर यांनी लिहिलेल्या कथेवर आधारित "पुतळा"शॉर्ट फिल्म विवेक नॅशनल फेस्टिवलला पाठवली. हा एक छोटासा प्रयत्न होता.मात्र या प्रयत्नांना खूप मोठे यश मिळाले होते.या शॉर्टफिल्म ला विवेक नॅशनल शॉर्टफिल्म फेस्टिवल 2017 ला ( स्पेशल ज्युरी ) अवॉर्डने सन्मानित करण्यात आलेले आहे.

ही शॉर्ट फिल्म बऱ्याच फेस्टिवल ला सिलेक्ट झाली.

यानंतर नवीन प्रयोग सुरु झाले."बुरगुंडा "या डॉक्युमेंटरी फिल्म ला एशियन इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल 2020 ला बेस्ट स्टोरी चा अवॉर्ड मिळाला. कल्चरल फिल्म फेस्टिवल 2023 मध्ये अहमदाबाद या डॉक्युमेंट्रीला ला बेस्ट कल्चरल फिल्मचा अवॉर्ड देखील मिळालेला आहे. हि त्यांनी केलेल्या नवीन कामाची पोच पावती त्यांना मिळाली.

"2 चाकं 435 दिवस " या डॉक्युमेंटरी फिल्म ला देखील बऱ्याच पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

5 वा अण्णाभाऊ साठे चित्रपट महोत्सव 2022. (सर्वोत्कृष्ट माहितीपट) चौथी एसएनएसएफएफ सांगली 2022. (सर्वोत्कृष्ट माहितीपट), तिसरा आरआयएफ महोत्सव संभाजीनगर 2022. (सर्वोत्कृष्ट माहितीपट ), १६ वा प्रतिबिंब चित्रपट महोत्सव 2022.(सर्वोत्कृष्ट माहितीपट) एसएनएसएफडी महोत्सव श्रीरामपूर 2022. (सर्वोत्कृष्ट माहितीपट ), एनटीएसएफ फेस्टिव्हल पुणे 2022. (विशेष ज्युरी) गदिमा चित्रपट महोत्सव 2022. (विशेष ज्युरी) 11 वा आरोग्य चित्रपट महोत्सव 2022. (सर्वोत्कृष्ट माहितीपट ),अरुणोदय चित्रपट महोत्सव 2022. (सर्वोत्कृष्ट माहितीपट), आशियाई टॅलेंट फिल्म फेस्टिव्हल 2022. (सर्वोत्कृष्ट माहितीपट) अशा विविध पुरस्कारांनी या माहितीपटाची दखल घेतलेली आहे.विविध फिल्म इन्स्टिट्यूट मध्ये या फिल्म च स्क्रीनिंग झालं आहे. एफ टी आय आय मध्ये सुद्धा या माहितीपटाचे स्क्रीनिंग झालेले आहे.

घरची पार्श्वभूमी फार हलाखीची होती. वडील लोक कलावंत. लोककलेला त्यांनी वाहून घेतलेले कीर्तन भारुड या माध्यमातून त्यांनी कायम लोककलेला पुजले. त्यामुळे घरची परिस्थिती कायम बेताचीच राहिली असे म्हटले तर ते वावनी ठरणार नाही. वडिलांमुळे कला हा प्रांत आपसूकच डोक्यात विणलेला होता वेगळ्या वाटेने तो मी देखील कायम जोपासला. घरची परिस्थिती बेताची होती मात्र कला पूजनीय होती. अशा कमकुवत परिस्थितीतूनच मार्ग काढत काढत आत्ता काही सिनेमांना सह दिग्दर्शक म्हणून काम केले आहे. त्यामध्ये रांजण, मिथुन, व्हायरल, बलोच आणि झी स्टुडिओच्या रुबाब नावाच्या सिनेमाचा समावेश आहे. सतत नवीन प्रयोग आणि विषयावर फिल्म करता याव्यात यासाठी ड्रीम विनर प्रॉडक्शन ची संस्था आणि यु ट्यूब चॅनेल पण काढले आहे.




यासागळ्या प्रवासात विजय चिकने ,अमोल लोखंडे,शंकर मदने, रोहित घोडके, विकास बोराटे याची साथ सतत मिळाली. निलेश महिगांवकर, प्रकाश पवार,शेखर बापु रणखांबे यांचं योग्य मार्गदर्शन मिळाले.विक्रम शिरतोडे, विशाल शिरतोडे, ऋषिकेश पवार या सगळ्यां क्रिएटिव्ह टीम सोबत पुढचा प्रवास सुरू आहे.



स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। शुक्रवार ।
। दि. 18 एप्रिल 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## विविध उपक्रमांतून डॉ. आंबेडकर यांना अभिवादन

# पुस्तक प्रदर्शनातून उलगडले विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर!

### शिक्षण विश्व: भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त पीसीयूमध्ये पुस्तक प्रदर्शन

**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**क्रांतीसुर्य विश्वरत्न भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, त्यांची विद्वत्ता नव्या पिढीला व्हावी यासाठी पिंपरी चिंचवड विद्यापीठाच्या वतीने पुस्तक प्रदर्शन भरवण्यात आले. या माध्यमातून विद्यार्थी मोबाईलच्या दुनिये पासून दूर होऊन पुस्तकांच्या जगात रमले. भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त पिंपरी चिंचवड विद्यापीठ, साते, वडगाव मावळ येथे विविध उपक्रम राबवून डॉ. आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.**



पीसीयू ग्रंथालय विभाग आणि पीसीयू स्कूल ऑफ लॉ यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवस पुस्तक प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. हजारो विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनात भेट दिली. उद्घाटन प्रसंगी कुलगुरु डॉ. मणिमाला पुरी आणि प्र कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी विद्यापीठाच्या विविध विभागाचे प्रमुख, शाळा विभाग प्रमुख उपस्थित होते.

या प्रदर्शनाचे आयोजन पीसीयू लायब्ररी डॉ. मतलूब अली खान आणि स्कूल ऑफ लॉ प्रमुख प्रियांक राणा, सहाय्यक प्रा. प्रदीप कुमार यादव यांनी केले होते. डॉ. आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा, भारतीय संविधानातील त्यांच्या मोलाच्या योगदानाची तसेच त्यांच्या सामाजिक न्यायासाठीच्या संघर्षाचा विस्तृत आढावा देणारी पुस्तके सादर करण्यात आली होती. हे प्रदर्शन विद्यार्थ्यांसह सर्व उपस्थितांना डॉ. आंबेडकरांचे विचार समजून घेण्यास प्रेरणादायी ठरले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट संचालित पिंपरी चिंचवड विद्यापीठ येथे वर्षभर सामाजिक उत्तरदायित्व आणि शैक्षणिक उत्कृष्टतेच्या दृष्टीने विविध उपक्रम राबविले जातात.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्मातई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा कुलपती हर्षवर्धन पाटील, व्यवस्थापन समिती सदस्य नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.

---

## नागरिकांना देण्यात आले अग्निसुरक्षेचे धडे..!

### महापालिकेच्या राष्ट्रीय अग्निशमन सेवा सप्ताहाच्या निमित्ताने अग्निसुरक्षा प्रात्यक्षिकांचे आयोजन

**। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**इमारतीच्या आठव्या मजल्यावर अचानकपणे लागलेली आग... स्थानिक रहिवांशाकडून आग विझवण्याचा केला जाणारा प्रयत्न.... नागरिकांनी संपर्क करताच आग विझवण्यासाठी अवघ्या काही मिनिटात अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेत आगीवर मिळवलेले नियंत्रण.... असा थरारच पिंपरी चिंचवड शहरातील निगडी परिसरात असणाऱ्या शरदनगर व दुर्गानगर सहकारी गृहनिर्माण संस्था येथे मंगळवारी (१५ एप्रिल) सकाळी १०.३० ते दुपारी १२.३० यावेळेत पाहण्यास मिळाला.**



निमित्त होते महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडून राष्ट्रीय अग्निशमन सेवा सप्ताहाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या 'मॉक ड्रिल'चे.

भारतात दरवर्षी १४ एप्रिल ते २० एप्रिल हा आठवडा 'राष्ट्रीय अग्निशमन सेवा सप्ताह' म्हणून पाळला जातो. १४ एप्रिल १९४४ मध्ये मुंबई डॉक येथे लागलेल्या विनाशकारी आगीत प्राण गमावलेल्या जवानांच्या शौर्य व बलिदानाचे स्मरण करण्यासाठी १४ एप्रिल हा दिवस समर्पित आहे. या दिवसानंतरचा संपूर्ण आठवडा 'अग्निसुरक्षा सप्ताह' म्हणून पाळला जातो. महानगरपालिकेच्या वतीनेही या सप्ताहाच्या निमित्ताने नागरिकांमध्ये अग्निसुरक्षेबाबत जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत.

अग्निसुरक्षेबाबत जनजागृती करण्यासाठी मंगळवारी निगडी येथील शरदनगर व दुर्गानगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, सेक्टर क्र. २० येथे अग्निप्रतिबंधात्मक उपाययोजना व मॉक ड्रीलचे आयोजन करण्यात आले होते. या मॉक ड्रील अंतर्गत इमारतीच्या आठव्या मजल्यावर आग लागल्याचे दृश्य तयार करण्यात आले. सुरुवातीला स्थानिक नागरिकांकडून आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र आगीची तीव्रता लक्षात घेता, त्वरित अग्निशमन विभागास पाचारण करण्यात आले. अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत २ वॉटर टेंडर, २ शीघ्र प्रतिसाद वाहने (देवदूत), ब्रांटो हायड्रोलिक प्लॅटफॉर्म (स्काय लिफ्ट) व ३० पेक्षा अधिक अग्निशमन जवानांच्या साहाय्याने आग आटोक्यात आणली.

> १४ एप्रिल १९४४ रोजी मुंबईच्या डॉकमध्ये झालेल्या भीषण स्फोटात अनेक शूर अग्निशामक जवानांनी आपले प्राण गमावले. त्यांच्या अतुलनीय शौर्याची आणि बलिदानाची आठवण जपण्यासाठी हा अग्निशमन सेवा सप्ताह देशभर पाळला जातो. या सप्ताहाच्या निमित्ताने पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांमध्ये अग्निसुरक्षेबाबत जागृती करण्यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. नागरिकांनी या जनजागृती कार्यक्रमांमध्ये सहभागी व्हावे.
> **–शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

या मॉक ड्रीलमध्ये उंच शिडीच्या साहाय्याने इमारतीतील अडकलेल्या नागरिकांचा यशस्वी बचाव करण्यात आला. घटनास्थळी उपस्थित नागरिकांना आगीचे धोके ओळखणे, आग लागल्यानंतरचे योग्य पावले उचलणे, अग्निसुरक्षा उपकरणांचा योग्य वापर व आपत्कालीन प्रसंगी सुरक्षिततेच्या उपायांबाबत माहिती देण्यात आली.

ADMISSION OPEN

From 21st April 2025
1 Hour /day
Monday to Saturday

# Moaraya Shikshan Sanstha Computer Vacation Batch

"यत् भावो – तत् भवति"

## Our Courses



- Corel Draw
- Adobe Photoshop
- Scratch Animation
- 'C' Language
- 'C ++' Language
- Basic Java
- Basic Tally
- M. S. Office

Contact: 8087706100/ Computer Lab
Registration started
Venue: Computer Lab, V. K. Mate Highschool

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

2025-26
ADMISSIONS
OPEN

PRIYADARSHANI
SCHOOL, ALANDI

42 YEARS OF ENRICHING EXPERIENCE IN EDUCATION

50 FIFTY PLUS NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS SCHOOLS

Contact Us Now
86687 55826
98232 31705

Wadgoan road, Sr.no. 98,
Opposite Ram Mandir,
Alandi 412105




MASTER MIND GLOBAL
SCHOOL & Jr. College
(CBSE)
( Since 2013)
ADMISSIONS
OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is
Creativity, There is
Master Mind
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
7
STAR
RANKING
A++ Grade
In Leadership & Quality
Management
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
Website : www.http://mastermindglobalschool.com


Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JR. COLLEGE
WE MAKE YOUR FUTURE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
ADMISSION
OPEN
2025-2026
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
• Computer Science
• Crop Science
• Electronics
• Mechanical / Technical Automobile
• Information Technology (IT)
For Commerce Stream
• Banking
• Marketing & Sales
• Office Management
• Small Industries & Self employment
• Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241

KAMALA Education Society

KAMALA EDUCATION SOCIETY'S

# PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT

**AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167**

Approved by AICTE | B+ NAAC Accredited | Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University

## ADMISSIONS OPEN

Full Time Undergraduate Courses (3 Years Degree Course, 4 Years Honours)



**BBA**

**Bachelor of Business Administration**



**BCA**

**Bachelor of Computer Applications**

### Highlights:

- Advanced Industrial and Research Learning
- Proven Track Record of Placements
- Mentoring and Seed Funds for Startups
- Skill Development and Certification Courses
- Live Industrial Projects
- Earn and Learn Scheme of Rs. 10,00,000+
- Govt. and Management Scholarships
- State of the Art infrastructure
- ICT enabled classrooms

Eligibility: Passed HSC Examination with any stream

**Call for more details:**

**BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556**

**BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895**

www.pibmpune.org.in

Scan QR code to know more